

१४ज्यानेवारी १७६१
पानिपत
आम्हीच
ते वेडे ज्यांना

## पानिपतची लढाई

* इतिहासात पानिपतच्या युद्धाची काही वेगळेच महत्त्व आहे कारण

१) मुगल साम्राज्य प्रस्थापित करणारा बाबर चे युद्ध इब्राहिमखान लोधी सोबत १५२६ ला झाले हे ठिकाण म्हणजे पानिपत होते आणि इथूनच भारतात मुघल सत्ता ही प्रस्थापित झाली होती.

२) मुघल साम्राज्याचा विस्तार करणारा अकबर व हेमू यांची लढाई १५५६ ला पानिपत येथे झाली होती आणि ही लढाई पानिपतची दुसरी लढाई म्हणून प्रसिद्ध होती.

(३) मराठी साम्राज्याला उतरती कळा लावणारी तिसरी लढाई ही (मराठे) सदाशिवरावभाऊ व अहमदशहा अब्दाली यांच्यात पानिपत या ठिकाणीच झाली होती.

* या तीनही लढाईत जर प्रतिस्पर्धी हा विजयी झाला असता तर भारताची स्थिती आज काही वेगळीच असती.

## पार्श्वभूमी

* नादिरशहा इराणी (फारस ) सम्राट च्या शहातहमासपण च्या राज्यात कार्यरत होता.

* अफगाणांनी कंदाहार व त्यानंतर इराण ची राजधानी इस्पहान वर हल्ला केला आणि ते मिळवले सुद्धा होते.

* १५२७ मध्ये नादिरशहा ने आपला जीव झोकून अफगानांना येथून हाकलून लावले.

* या वर इराणी सम्राट ने खुश होऊन काही प्रदेश नादिरशहा ला देऊन टाकला होता.

* समोर १५३७ मध्ये नादिरशहाने पूर्ण फारस वर आपला अधिकार प्रस्थापित केला. यामुळे तो फारस चा शासक बनला. समोर १५३७ मध्ये नादिरशहाने पूर्ण फारस वर आपला अधिकार प्रस्थापित केला.

* यामुळे तो फारस चा शासक बनला.

* समोर सफदरजंगला अवध व अलाहाबाद चे सुभेदारी पद पाहण्याची परवानगी देण्यात आली तर इमाद उल-मुल्क आता वजीर झाला. नजीबखान मीरबक्षी झाला.

* पुढे एक वर्षाने सफदरजंग हा मरण पावला. (१७५४) त्या ठिकाणी त्याचा मुलगा शूज -उद-दौला हा गादीवर बसला.

* सफदरजंग सारख्या जुन्या मित्राची साथ सोडून इमाद सारख्या लोकांना बाळाजी बाजीरावाने कदाचित यासाठी मदत केली. की दुआब ' मधील तर चौथाई वसूल करण्यासाठी एखादा कमजोर वजीर मित्र असणे सोयीचे होईल.

पण यामुळे अवधच्या नवाबाच्या मनात मराठीविषयक जबरदस्त संशय निर्माण झाला. त्याची मोठी किंमत मराठ्यांना भोगावी लागली.

* समोर इमाद उल-मुल्क ने १७५४ मध्ये अहमदशहाची हत्या केली तर दुसऱ्या आलमगीरची १७५९ मध्ये हत्या घडवून आणली.

- अहमदशहा अब्दाली
- * अहमदशहा अब्दाली नादिरशहा च्या लष्करात एक अधिकारी होता.
- * नादिरशहा च्या भारताच्या स्वारीत त्याने भाग घेतला होता यामुळे भारतातील मुघलांची स्थिती, भारतातील अफाट संपत्ती या सर्वांची त्याला जाणीव होती.
- * बऱ्याच युद्धात भाग घेतल्यामुळे त्याचा लष्करी अनुभव भक्कम होता अशाच अनुभवाचा वापर करत त्याने १७४८ मध्ये नादिरशहा ला ठार केले व पूर्ण अफगाणिस्तानची सत्ता स्वताच्या हातात घेतली.
- * नादिरशहा ला ठार केल्यामुळे त्याची कमावलेली भारताची संपत्ती आता अब्दालीच्या ताब्यात आली होती या कारणामुळे तो आता शक्तिशाली बनला होता.
- * सफदरजगन १२ एप्रिल १७५२ रोजी शिंदे-होळकर याच्याशी एक करार केला.
- 1) मराठ्यांनी पठाण, राजपूत, इतर बंडखोर, अब्दाली सारख्या शत्रूपासून बादशहाचे रक्षण करावे.
- 2) या बदल्यात बादशहाने पेशवास ५० लाख रुपये द्यावेत.
- 3) पंजाब, सिंध व दुआब प्रदेशातील चौथाईचा हक्क पेशव्यास दयावा.
- 4) आग्रा व अजमेरची सुभेदारी मराठ्यांना द्यावी.
- * इकडे अब्दाली हा भारतात आला होता तेव्हा पंजाबचा सुभेदार मीर मुन्नू ( मुईन उल मुल्क) हा होता.
- * त्याने अब्दालीशी तह केला कि लाहोर व सुलतान अब्दालीला द्यावे.
- * सफदरजंग ने मराठ्यांशी करार केला होता पण दिल्ली सम्राट अहमदशहा हा भयग्रस्त झाला होता. या कारणाने त्याने मीर- मुन्नू व अब्दालीच्या कराराला मान्यता दिली.

- पहिले आक्रमण (१७४८)
- ⁎ अहमदशहा अब्दालीचा उदयानंतर त्याने १७४८ मध्ये भारतावर पहिले आक्रमण केले.
- ⁎ १७४८ मध्ये त्याने पंजाब मध्ये प्रवेश केला व लाहोर काबीज करून टाकले.
- ⁎ याचवेळी मुगल बादशहा मोहम्मदशहा आजारी असल्यामुळे त्याने आपला मुलगा अहमदकडे या युद्धाचे नेतृत्व दिले.
- ⁎ मोहम्मदशहा ने यावेळी मराठ्यांना सुद्धा मदत मागितली होती यामुळे पेशव्यांनी शिंदे आणि होळकर यांना पंजाब ला जाण्याचा याना आदेश दिला पण त्याचा जास्त फायदा झाला नाही कारण तोपर्यंत मुघलांनी अब्दालीचा पराभव केला होता.
- ⁎ अहमद च्या नेतृत्वात असलेल्या तुकडीने पर सरहिंद जवळ मनुपुर येथे अब्दालीचा पराभव केला आणि हा मुघलांचा शेवटला विजय होता.
- ⁎ या लढाईत मुगलांचा वजीर कमरुद्दीन मारला गेला.

- दुसरे आक्रमण ( १७४९)
- ⁎ तिकडे बंगश अफगाणांचा बंदोबस्त करण्यासाठी सफदरजंग ने मराठ्यांची मदत घेतली मराठ्यांनी शिंदे-होळकर यांना त्यांच्या
- मदतीला पाठवले.
- ⁎ मराठ्यांनी स्वारीच्या खर्चापोटी दररोज 25000 घेण्याचे कबूल केले.
- ⁎ त्यांनी बंगश अफगान म्हणजेच अहमदखान बंगश चा पराभव केला.
- ⁎ मराठ्यांचा खर्च देण्याची जबाबदारी सफदरजंगणे अहमदखान बंगश वर ढकलली.
- ⁎ असे दिसते की स्वारीच्या खर्चाच्या बदलात मराठ्यांना फुफुंद, शिकोहाबाद, इटावा नावाचे परगणे व पेशव्यांच्या नावाने कडा जहानाबाद हे प्रदेश मिळाले. अशा रीतीने मराठ्यांनी गंगेच्या दुआब मध्ये प्रवेश मिळवला.
- ⁎ इकडे अब्दाली हा भारतावर चालून आला होता त्यामुळे पंजाबचा सुभेदाराने अब्दालीशी तह केला त्याला परत पाठवले पण सफदर जंग व रोहिले यांच्यात अजूनही संघर्ष चालूच होता.

- तिसरे आक्रमण ( १७५१ )
- ∗ सफदरजंग व रोहिले यांच्यात संघर्ष संपला नव्हता थोडा धार्मिक भावनाही या संघर्षात आल्या होत्या.
- ∗ कारण सफदरजंग हा शियापंथाचा तर रोहिले हे सुन्नी पंथाचे होते.
- ∗ सफदरजंग हा बंगश विरुद्ध झालेल्या लढाईत मिळालेल्या मराठ्यांच्या विजयामुळे खुश होता. या कारणामुळे त्याने रोहिले विरुद्ध मराठ्यांचे पाचरण केले.
- ∗ परिणामी मराठे व रोहिले यांच्यात संघर्ष सुरू झाला. शेवटी परत रोहिल्यांनी अब्दालीला भारतात आमंत्रित केले.
- ∗ अखेर अहमदशहा अब्दाली १७५१ मध्ये परत भारतात आला.
- ∗ दिल्लीवर अहमदशाह अब्दालीचे आक्रमण होईल याची जाणीव अहमदशाहला झाली होती. त्यामुळे त्याने सफदरजंगला समोर करून मराठ्यांशी एक करार केला.

- चौथे आक्रमण (१७५६)
- ∗१ जून १७५४ रोजी वजीर गाजीउद्दीन ने आलमगीर दुसरा याला गादिवर बसवले.
- ∗ समोर पंजाबचा सुभेदार मीर मन्नू (मुईन उल मुल्क) याचा मृत्यू झाल्यावर त्याची पत्नी मुगलांनी बेगम ही त्याच्या लहान मुलांच्या वतीने कारभार पाहू लागली.
- पण गाजीउद्दिन ने तिला हटवून आदिना बेग ची नियुक्ती पंजाबचा सुभेदार म्हणून केली.
- ∗ यावर मुगलांनी बेगम हे प्रचंड चिडली व रागाच्या भरात तिने अब्दाली ला भारतात परत आमंत्रित केले.
- ∗ यानुसार अब्दाली १७५६ मध्ये पंजाब येथे आला. सुरुवातीला त्याने पंजाबचा बंदोबस्त केला नंतर थेट दिल्ली कडे वळला.
- ∗ जानेवारी १७५७ मध्ये तो दिल्लीत आला व एक महिना त्या ठिकाणी थांबला.

- आमना सामना
- २१४ जानेवारी १७६१ प्रत्यक्ष युद्धाला सुरुवात झाली. ही लढाई सुमारे सकाळी ९ ला सुरु झाली तर संध्याकाळी ४.३० - ५,०० वाजेपर्यंत चालली.
- ⁎ भाऊसाहेब व विश्वासराव ही हत्तीवर आरूढ होते.
- ⁎ सुरुवातीला मराठे हे अब्दालीच्या सैन्यावर हावी झाले. इब्राहीमखान गारदीच्या तोफखानाणे २००० रोहिल्यांना ठार केले.
- ⁎ यावर अब्दालीने अजून कुमक पाठवून गारदीची पलटण गारद केली.
- ⁎ भाऊसाहेबांनी वजीर शाहवलीची साखळी तोडल्याने त्याचे सैन्य इकडे तिकडे पळू लागली. शहावली हा सैन्याला ओरडू लागतो की तुम्ही कुठे पळता काबुल दूर आहे.
- ⁎ शेवटी अब्दालीने काही राखीव सैनिकांना पाठवून पळणाऱ्या सैनिकांना ठार मारण्याचा आदेश दिला.



- *मल्हारराव हे नजीबखान शी संगमत असल्यामुळे ते जणकोजी ला सोडून निघाला निघून गेले.
- * मराठ्यांची सरशी दिसत होती. तेव्हा अब्दालीने राखीव सैनिक युद्धात उतरवले.
- * अब्दालीच्या राखीव सैनिकाच्या तुलनेत मराठ्यांचे सैन्य थकले होते. त्यामुळे राखीव सैनिक आता आघाडीवर येऊ लागले.
- * मराठ्यांचे काही सैनिक स्त्रियांना व मुलांना रक्षण करण्यात अडकले होते.
- * अशातच विश्वासराव यांना गोळी लागली व ते ठार झाले. यामुळे भाऊ प्रचंड चिडले व त्यांनी अनेक अफगानांना मारायला सुरुवात केली.
- * पण अशातच भाऊ सुद्धा मारले गेले.
- * भाऊ न दिसल्यामुळे मराठे सैन्य सैरावैरा पळू लागले.
- * याचा फायदा अब्दालीने घेतला त्याने अनेक मराठ्यांची कत्तले केली.
- * जनकोजी, तुकोजी शिंदे, गारदी, दामाजी गायकवाड हे सर्व ठार झाले. नाना फडणवीस, महादजी शिंदे कसेबसे यातून बचावले.

